REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# नागपूर जिल्ह्यातील बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांचे अध्ययन

प्रा. डॉ. इफ्तेखार आर हुसैन
सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज,
कामठी, जिला नागपुर

**सारांश**



महिला बचत गटांच्या माध्यमातून महिला सर्वच आघाड्यावर पुरुषांच्या बरोबरीने येऊ लागल्या आहेत. त्यांच्या मध्ये जागृती होऊ लागल्या आहे. ग्रामीण गरिबी हटविण्यासाठी स्वयंरोजगारात वाढ व लघुउद्योगात वाढ करणे अतिशय महत्वाचे आहे. लघुवित्तातून लघुउद्योग व त्याद्वारे गरिबी निर्मुलन करणे शक्य आहे म्हणून आज बचत गटावर भर दिल्या जात आहे. नागपूर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणावर दारिद्र्या, निरक्षरता, बेकारी या समस्या आहेत त्यातही महिलासमोर या समस्या जास्त तीव्र आहेत. नागपूर जिल्ह्यातील महिला अति मागास अवस्थेत जीवन जगत आहेत त्यातून मार्ग काढण्यासाठी महिलांनी बचत गटांची स्थापना करून स्वत:च्या प्रगती बरोबरच नागपूर जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावला आहेत.

वरील परिस्थितीचा विचार करुन प्रस्तुत शोधप्रबंधात "नागपूर जिल्ह्यातील बचत गटात सहभागितेचा बचत गट सदस्यांच्या जीवनावर झालेल्या प्रभावासंबंधीचे अध्ययन" या विषयावर संशोधनकर्तीने अभ्यास केलेला आहे.

## प्रस्तावना

स्वयंसहाय्यता बचत गट चळवळीचे मूळ हे जागतिक पातळीवर मागासलेले राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बांग्लादेशात असल्याचे दिसते. ही चळवळ उभारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बांग्लादेशातील चितगाव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. महंमद युनूस यांच्या अथक परिश्रमातून घडवून आले.
डॉ. महंमद युनूस यांनी हॉवर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्राची पदवी घेवून ते याच विद्यापीठात अध्यापनाचे कार्य करत होते. पुढी मातृभूमीच्या ओढीने १९७६ साली बांग्लादेशात परतले व आपल्या ज्ञानाचा फायदा स्वदेशातील विद्यार्थी तसेच समाजाला व्हावा यासाठी ते चितगाव विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. हे कार्य करत असतांनाच त्यांनी विद्यापीठ परिसरातील गरिब गावकऱ्यांच्या कर्ज प्रश्नांचे निर्मूलन करण्याचा इरादा केला.
बांग्लादेशातील चितगाव विद्यापीठाजवळील 'जोबरा' या गावातील महिला व पुरूष जीवन जगण्यासाठी धडपडत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. गावातील जनतेला वर्षानुवर्षे बँकांनी नाकारल्यामुळे तेथील प्रत्येक व्यक्ती हा सावकारी पाशात भरडला गेला होता. या लोकांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी महंमद युनूस यांनी या गावातील ४० व्यक्तींना स्वत: विना तारण कर्ज स्वरूपात वित्त पुरवठा केला. ज्याचा मुख्य उद्देश हा या लोकांना अर्थकारणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण

करणे हा होता. या गरिब व्यक्तिनी घेतलेल्या कर्जाची विनाविलंब पूर्ण रक्कमेसह परतफेड केली. त्यामुळे त्यांना असा विश्वास प्राप्त झाला की, गरिबांना दिलेले कर्ज ते विनाविलंब पूर्ण रक्कमेसह परत करतात. लोकांनी घेतलेल्या कर्जाच्या आधारे उत्पादीत केलेल्या वस्तूची होणारी विक्री पाहणे व त्यांच्याद्वारे केल्या जाणाऱ्या आर्थिक व्यवहाराची पाहणी करण्यासाठी डॉ. महंमद युनूस हे स्वत: गावातील आठवडी बाजाराचा बारकाईने अभ्यास करत असत. हाच धागा पकडून त्यांनी पुढे लोकांना एकत्रित व संघटीत करून स्वयंसहाय्यता बचत गटाची सुरुवात केली.

डॉ. महंमद युनूस यांनी चालू केलेले ४० गट हे १९७६ साली स्थापन झालेल्या व्हिलेज बँकेला जोडण्याचा प्रयत्न केला. परंतू बँक अधिकाऱ्याना ही कल्पना मान्य नव्हती. पुढे डॉ. महंमद युनूस यांनी अशा प्रकारच्या गटांसाठी कर्ज पुरवठा व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले. परिणामी १९८३ साली बांग्लादेशात विशेष कायदा समंत करून १९७६ साली स्थापन झालेल्या व्हिलेज बँकेचे रूपांतर ग्रामीण बँकेत केले. त्यानंतर या ग्रामीण बँकेच्या माध्यमातून बांग्लादेशात गरिबांना व महिलांना वित्तीय सुविधांचा पुरवठा केला जात असे. डॉ. महंमद युनूस यांनी महिलांना सहभागी करून आर्थिक, सामाजिक कार्यात महिलांचा सहभाग ही सामाजिक क्रांती घडवून आणून महिलांचे सक्षमीकरण केले.

बांग्लादेशातील ग्रामीण बँकेचे अत्याधिक खातेदार हे आर्थिकदृष्ट्या गरिब वर्गातील आहे. ग्रामीण बँकेद्वारे बांग्लादेशात मोठ्याप्रमाणात स्वयंसहाय्यता गट स्थापन करून त्यांना विनातारण कर्ज वाटप केले आहे. परिणामी तेथील गरिब लोकांना विशेषत: महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या आहेत. याबाबीतून बांग्लादेशात बहूतांश प्रमाणात दारिद्र्या निर्मूलन झाले आहे. या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन प्रा. डॉ. महंमद युनूस व ग्रामीण बँकेला २००६ सालचा 'नोबेल पारितोषिक' देवून सन्मानीत करण्यात आले.

**सारणी क्रमांक १: बचत गट सदस्यांना बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांचा प्रकार | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| कुटुंबाच्या सहकार्याचा अभाव | १४६ | ४१.७ |
| शासनाच्या योजनांबद्दल जागरूकता नसणे | २६७ | ७६.३ |
| बँकची लांब कागजी कार्यवाही | १४६ | ४१.७ |
| अधिकाऱ्यांच्या सहयोगाचा अभाव | ९५ | २७.१ |
| राजकीय हस्तक्षेप | ९१ | २६.० |
| इतर | १२ | ३.४ |

उपरोक्त सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना बचत गट चालविण्यात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ४१.७ टक्के बचत गट सदस्यांना बचत गट चालविण्यात कुटुंबाचा सहकार्य प्राप्त होत नसून बचत गटासंबंधी शासनाच्या योजनांबद्दल जागरूकतेचा अभाव दर्शविणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी ७६.३ टक्के होती. तसेच अनुक्रमे ४१.७ टक्के, २७.१ टक्के, २६.० टक्के व ३.४ टक्के बचत गट सदस्यांना बचत गट चालविण्यात बँकची लांब कागजी कार्यवाही, अधिकाऱ्यांच्या सहयोगाचा अभाव, राजकीय हस्तक्षेप व इतर समस्यांचा सामना करावा लागतो. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील बचत गट चालविण्यात शासनाच्या योजनांबद्दल जागरूकतेचा अभाव सहन करणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक २: बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत असण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गटामार्फत चालविले जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १३७ | ३९.१४ |
| नाही | २०२ | ५७.७१ |
| सांगता येत नाही | ११ | ३.१४ |
| **एकूण** | **३५०** | **१००.०** |
| **Chi-Square** | **Df** | **Sig** |
| **758.260** | **6** | **<0.05** |

Chi Square- काई वर्ग मूल्य; df (degrees of Freedom)- स्वातंत्र्यांश; Sig.- (Significance)- सार्थकता

उपरोक्त सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत असण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ३९.१४ टक्के बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागतो. तसेच ५७.७१ टक्के बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागतो व वरील विधानासंबंधी सांगता येत नाही ही प्रतिक्रिया देणाऱ्या बचत गट सदस्यांची टक्केवारी ३.१४ होती. काई वर्ग चाचणीच्या परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत असण्यानूसार नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांदरम्यान सार्थक (काई वर्ग मूल्य – ७५८.२६०; P<०.०५) फरक आहे. म्हणजेच नागपूर जिल्ह्यातील गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत नसणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

**सारणी क्रमांक ३: बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविणारी सारणी**

| बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्या | वरंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| सभासदांचे दुर्लक्ष | ४० | ११.४ |
| व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव | १०१ | २८.९ |
| सभासदांमध्ये समन्वयाचा अभाव | ५८ | १६.६ |
| विपणन पद्धतीसंबंधी जागरूकतेचा अभाव | ७५ | २१.४ |
| आर्थिक स्वरुपात सक्षम सभासदांद्वारे इतर सभासदांवर दबाव टाकण्याचा | १० | २.९ |

उपरोक्त सारणी क्रमांक ३ मध्ये नागपूर जिल्ह्यातील बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात येणाऱ्या समस्यांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ११.४ टक्के बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात सभासदांचा दुर्लक्ष सहन करावा लागत असून २८.९ टक्के बचत गट सदस्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव सहन करावा लागतो. तसेच अनुक्रमे १६.६ टक्के, २१.४ टक्के व २.९ टक्के बचत गट सदस्यांना बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात सभासदांमध्ये समन्वयाचा अभाव, विपणन पद्धतीसंबंधी जागरूकतेचा अभाव व आर्थिक स्वरुपात सक्षम सभासदांद्वारे इतर सभासदांवर दबाव टाकण्याचा त्रास सहन करावा लागतो. परिणामांवरून असे निदर्शनास येते की, बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.

## निष्कर्ष

- बचत गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव अनुभवणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.
- नागपूर जिल्ह्यातील गटामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यवसायात समस्यांचा सामना करावा लागत नसणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे.
- नागपूर जिल्ह्यातील बचत गट चालविण्यात शासनाच्या योजनांबद्दल जागरूकतेचा अभाव सहन करणाऱ्या बचत गट सदस्यांची संख्या इतर सदस्यांच्या तूलनेत महत्वपुर्णपणे अधिक आहे

## संदर्भ

१) Bandura Albert.(1986). "Social foundation of thought, Egliwood cliffs, N.J. Prentice-Hall.
२) Batliwala S. (1994). "Empowerment of Rural South Asia, Asian South Pacific Bureau, Shrilanka.
३) Cencus (2011). Government of India.
४) Censes of India (2001).
५) Fernandez Aloysivs P., (2007). Occasinal Paper on History and Spread of the Self-Help Affinity Group Movement in India, IFAD, P.8.
६) Feroze, S.M. and Chavhan, A.K., (2011). Microfinacne in India: A Performance Evaluation, New Cerntury Publication, New Delhi. P.3.